।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर,विष्णुपूरी,नांदेड —४३१६०६(महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 (Maharashtra)

Established on 17th September 1994,Recognized by UGC U/s 2(f)and 12(B),NAAC Re accredited with 'A'Grade

## DEPARTMENT OF EXAMINATION (ELIGIBILITY SECTION)

Phone:(02462)229242,43,44 Website:srtmun.ac.in

Ref.No. :Exam./ Eligibility/2019-20/3257 Date :- 06 - 08 - 2019

# परिपत्रक

**विषय: पात्रता आवेदन पत्र स्विकारणे बाबत**

वाचा :— १. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. शै. /पात्रता/पदवीप्रवेश/२००४—०५, दिनांक २८/०५/२००४.

. २. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. Acad/Eligi/Admn./Gen.Rules/२८०.२४९,दिनांक १५/०६/२०११.

या परिपत्रकाद्वारे सर्व संलग्नित पदवी व पदव्युत्तर महाविद्यालय, सर्व संकुले, उपकेंद्र लातूर, उपपरिसर परभणी सह न्यु मॉडेल डिग्री कॉलेज हिंगोली येथील प्रवेशित विद्यार्थ्यांचे शै.वर्ष २०१९—२० करिता पात्रता आवेदन पत्र मागील वर्षा प्रमाणे **ऑनलाईन** सादर करावयाचे आहेत या अनुषंगाने पात्रता शुल्काचा धनाकर्ष व पात्रतेच्या यादया व इतर माहिती विद्यापीठात सादर करावयाचे वेळापत्रक खालील प्रमाणे राहील.

**पात्रता शुल्क तक्ता**

| अ.क्र. | विवरण | शुल्क ( रूपये ) |
|---|---|---|
| १ | मराठवाडयातील विद्यार्थ्यांकरीता | ११०/— |
| २ | मराठवाडा क्षेत्राबाहेरील, परंतू महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांकरीता | २१०/— |
| ३ | महाराष्ट्र राज्याबाहेरून येणारे विद्यार्थ्यांकरीता | ५१०/— |
| ४ | Ph.D. विद्यार्थ्यांकरीता ( भारतातील विद्यार्थ्यांकरीता ) | ५१०/— |
| ५ | Ph.D. विद्यार्थ्यांकरीता ( परदेशीय विद्यार्थ्यांकरीता ) | ७१०/— |

**पात्रता आवेदन पत्र दाखल करण्याचा वेळापत्रक**

| अ. क्र. | विवरण | पात्रता आवेदनपत्र ऑनलाईन सादर करण्याचा दिनांक | पात्रता आवेदन पत्र शुल्काचा धनाकर्ष/e-payment करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पदवी अभ्यासक्रमासाठी पात्रता आवेदन पत्र सादर करणे | ०६/०८/२०१९ ते २८/०८/२०१९ | १५/०९/२०१९ |
| २ | पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पात्रता आवेदन पत्र सादर करणे | १५/०८/२०१९ ते १५/०९/२०१९ | |
| ३ | व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी पात्रता आवेदन पत्र सादर करणे | प्रवेश प्रक्रिया केंद्रिय पध्दतीने होत असल्यामुळे कटऑफ दिनांका पासून दहा दिवसा पर्यंतचा कालावधी | कटऑफ दिनांकापासून पंधरा दिवसा पर्यंतचा कालावधी |

**वरील प्रमाणे ऑनलाईन सादर केलेल्या पात्रता आवेदनपत्राची प्रिंट व आवश्यक कागदपत्रांच्या सांक्षाकिंत प्रतीसह प्रस्तुत विद्यापीठ नांदेड,उपकेंद्र लातूर, व परभणी येथे खालील प्रमाणे जिल्हा निहाय सादर करण्याचा अंतिम दिनांक. २४ /०९/२०१९ राहील.**

१. **नांदेड जिल्हा:** पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ,नांदेड

२.**परभणी व हिंगोली जिल्हा**: उपकेंद्र, परभणी, प्रस्तुत विद्यापीठ

३.**लातूर जिल्हा**: उपकेंद्र लातूर, प्रस्तुत विद्यापीठ

वरील प्रमाणे लातूर व परभणी येथील उपकेंद्र संचालक यांनी सर्व पात्रता आवेदन पत्र सोबतच्या कागदपत्रासह व शुल्कासह पात्रता विभाग,प्रस्तुत विद्यापीठ नांदेड येथे दिनांक २६/०९/२०१९ रोजी खास दूता मार्फत पाठवून द्यावे.

## प्रवेशीत विद्यार्थ्यी पात्रता घेण्यासाठी विशेष सुचना व नियम

१) प्रस्तूत विद्यापीठातील पदवी प्रथम वर्षात अनुतीर्ण होऊन त्याच वर्गात पुर्नप्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पात्रता आवेदनपत्र ऑनलाईन सादर करावे. पदवी द्वितीय व तृतीय वर्षातील अनुतीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुनरप्रवेश देण्यात येऊ नयेत.

२) पदवी परीक्षेच्या प्रथम वर्षात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्याने १०+२ या शैक्षणिक आकृतीबंधाप्रमाणे मान्यता प्राप्त बोर्डाचा अभ्यासक्रम पुर्ण केलेला असणे आवश्यक आहे.

३) पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश देते वेळी विद्यार्थ्याना १०+२+३ या शैक्षणिक आकृतीबंधाप्रमाणे मान्यताप्राप्त शासनमान्य विद्यापीठातुन अभ्यासक्रम पुर्ण केलेला असणे आवश्यक आहे.तसेच M.A. व M.SC. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश देताना त्या – त्या विषयातील २४ क्रेडीट पूर्ण करणे अनिवार्य आहे. त्या शिवाय प्रवेश देण्यात येऊ नये.

४) स्थानांतर प्रमाणपत्राची (Transfer Certificate) मुळप्रत हरवल्यास, त्याची पूर्ण खात्री करून, त्याबाबतीत विद्यार्थ्याचे हमीपत्र घेऊन प्रवेश देण्यात यावा. मात्र अशा प्रवेशाच्या संदर्भात कालांतराने चुकीची माहीती निर्दशनास आल्यास असे प्रवेश रद्द करण्यात येतील व त्यामुळे होणाऱ्या सर्व परिणामाची जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची राहील.

५) काश्मीरी निर्वासित व्यक्तीच्या पाल्याच्या प्रवेशासाठी या विद्यापीठाचे परीपत्रक Acad/Elig/Admn/२००४. ०५/३८९०.४०८९ दिनांक २३.३.२००५ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

**६) महाविद्यायाने सादर केलेली पात्रता यादी हिवाळी २०१९ या परीक्षेच्या प्रवेश पत्र (Admit Card) तयार करणेसाठी वापरण्यात येणार आसल्याने प्रवेशीत विद्यार्थ्यांची पात्रता यादी तयार करतांना ज्या गुणपत्रका आधारे प्रवेश देण्यात येणार आहे त्या गुणपत्रकावरचे नाव टाईप करुन त्याने निवडलेल्या विषयासह अचूक यादी सादर करावी झालेल्या चूकीमुळे विद्यार्थ्यांचा निकाल EC मध्ये राहिल्यास यास महाविद्यालय जबाबदार राहील.**

७) ज्या विषयास मान्यता/ संलग्निकरण आहे तेच विषय/विषय ग्रुप साठी प्रवेश देणे बंधनकारक आहे. परीक्षा विभागाच्या पूर्व परवानगीशिवाय दुसऱ्या विषयाचे नाव/ग्रुप निवडुन परीक्षा दिल्यास त्यांची झालेली परीक्षा रद्द करण्यात येईल.

८) पात्रता यादया ०४ प्रती मध्ये सादर कराव्यात.

९) शैक्षणिक वर्ष २०१९– २० साठी संलग्निकरण पत्र तसेच क्रीडा, विद्यार्थी कल्याण, राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) या विभागाचे NO DUES सोबतच्या प्रपत्रात सादर करावे.

१०) महाविद्यालयांनी संबंधीत अभ्यासक्रमाच्या पात्रतेचे निकष पाहुनच विद्यार्थ्यांनां प्रवेश दयावेत.

११) शैक्षणिक वर्ष २०१९ – २० मध्ये नव्याने सुरू झालेल्या महाविद्यालयाने पात्रता आवेदन पत्रासोबत शासन मान्यता व विद्यापीठ संलग्निकरणाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

१२) महाविद्यालयास पात्रता शुल्काचा धनाकर्ष, पात्रता आवेदनपत्र दाखल करण्यास विलंब झाल्यास विहीत तारखेनंतर प्रति दिन रू. १००/– विलंब शुल्क आकारण्यात येईल.

१३)प्रस्तुत विद्यापीठाचे पदवीधारक विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेत असतील तरीही पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पात्रता आवेदनपत्र व पात्रता शुल्क सादर करणे बंधनकारक आहे.

१४)पात्रता आवेदन पत्रासोबत खालील कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे.

| अ क्र | पदवी अभ्यासक्रमासाठी | प्रकार | अ क्र | पदव्यूत्तर अभ्यासक्रमासाठी | प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| अ | १२वी चे गुणपत्रक (Statement of Marks) अथवा समकक्ष परीक्षेचे गुणपत्रक | सांक्षाकित छायाप्रत | अ | पदवीचे गुणपत्रक (Statement of Marks) अथवा समकक्ष परीक्षेचे गुणपत्रक | सांक्षाकित छायाप्रत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| ब | पूर्वी शिकत असलेल्या शाळेचे/ महाविद्यालयाचे स्थानांतरण प्रमाणपत्र (Transfer Certificate) | सांक्षाकित छायाप्रत | ब | पूर्वी शिकत असलेल्या महाविद्यालयाचे स्थानांतरण प्रमाणपत्र (Transfer Certificate) | सांक्षाकित छायाप्रत |
| क | स्थलांतर प्रमाणपत्र Migration Certificate(स्वा.रा.ती.म. विद्यापीठाबाहेरील विद्यार्थ्यासाठी) | मुळप्रत | क | स्थलांतर प्रमाणपत्र Migration Certificate(स्वा.रा.ती.म. विद्यापीठाबाहेरील विद्यार्थ्यासाठी) | मुळप्रत |
| ड | खंड प्रमाणपत्र (Gap Certificate) (शिक्षणात खंड पडलेला असल्यास) | सांक्षाकित छायाप्रत | ड | खंड प्रमाणपत्र (Gap Certificate) ( शिक्षणात खंड पडलेला असल्यास) | सांक्षाकित छायाप्रत |
| इ | जातीचे प्रमाण पत्र (Caste Certificate)मागासवर्गीयांसाठी व आवश्यक तेथे जात वैधता प्रमाणपत्र Caste Validity Certificate व्यावसायीक अभ्यासक्रमांसाठी | सांक्षाकित छायाप्रत | इ | जातीचे प्रमाण पत्र (Caste Certificate)मागासवर्गीयांसाठी व आवश्यक तेथे जात वैधता प्रमाणपत्र Caste Validity Certificate व्यावसायीक अभ्यासक्रमांसाठी | सांक्षाकित छायाप्रत |

**:पात्रता आवेदन पत्रासोबतची जोडपत्रे:**

१५) परिच्छेद १४ मध्ये नमुद केलेल्या कागदपत्रांच्या प्रती पात्रता आवेदन पत्रासोबत ३१डिसेंबर २०१९ पर्यंत कागद पत्राची पूर्तता करणे आवश्यक आहे. जर ३१डिसेंबर २०१९ पर्यंत कागद पत्राची पूर्तता केलेली नसल्यास प्रती विद्यार्थ्यास रू.५००/— विलंब शुल्क आकारण्यात येईल.

१६) प्राचार्य/प्रभारी प्राचार्य यांना पात्रता आवेदन पत्रावर स्वाक्षरी केलेली आहे, अशा प्राचार्य/प्रभारी प्राचार्य यांच्या नियुक्तीस विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

१७) अतिरीक्त तुकडी असल्यास, विद्यापीठ संलग्नीकरण व शासनमान्यतेचे पत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१८) ज्या महाविद्यालयांना प्रवेश क्षमते पेक्षा जास्त प्रवेश देण्यास विद्यापीठाने मान्यता दिलेली आहे अशा मान्यता पत्राची प्रत प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे,त्या प्रवेश क्षमते पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना पात्रता मान्य करता येणार नाही.

१९) शैक्षणिक वर्ष २०१९—२० मध्ये महाविद्यालयातील सर्व पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमांच्या एकुण प्रवेशित विद्यार्थ्यांची(प्रथम,द्वितीय व तृतीय वर्षातील) माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' मध्ये पात्रता आवेदनपत्रा सोबत सादर करणे आवश्यक आहे. अशी माहिती सादर करताना महाविद्यालयात शिकविल्या जाणा—या प्रत्येक अभ्याक्रमासाठी (उदा. बी.ए.,बी.कॉम, बी.एस्सी., बी.बी.ए.,एम.ए.,एम.एस्सी., एम.कॉम, व्यावसायीक व इतर अभ्यासक्रम इत्यादी) स्वतंत्र पान वापरावे. हि माहिती ०६ प्रतीत आणावी.त्यापैकी एक प्रत सांख्यिकी विभाग, विशेष कक्ष, क्रीडा विभाग, विद्यार्थी कल्याण, राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) व पात्रता विभाग येथे सादर करावी व त्याची पोच प्रत पात्रता विभागात सादर करावी.

२०)विद्यार्थ्यांची पात्रता विद्यापीठाने मान्य केलेली नसेल किंवा एखादा विद्यार्थी पात्रता आवेदन पत्र/शुल्क सादर न करता परीक्षेस बसला असल्याचे निदर्शनास आल्यास अशा विद्यार्थ्याचे प्रवेश/परीक्षा त्वरीत रद्द करण्यात येईल.

२१) **कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थांना किंवा त्यांच्या पालकांना त्रुटीची पूर्तता किंवा त्या संबंधीत कामासाठी विद्यापीठात पाठविण्यात येऊ नये अशा सर्व त्रुटी महाविद्यालयीन स्तरावर संकलीत करून त्रुटीची पूर्तता करण्यास्तव महाविद्यालयीन कर्मचा—यास पाठविण्यात यावे.**

२२) व्यावसायीक अभ्यासक्रमांसंदर्भात केंद्रीय पध्दतीने होणाऱ्या प्रवेशाबाबत प्रवेश नियंत्रण समिती व बार कौन्सील ऑफ इंडीया, ए.आय.सी.टी.ई.,डी.टी.ई. इत्यादी प्राधीकरणांतर्गत होणाऱ्या प्रवेशासंबंधीत संबधी शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक आहे.

२३) व्यावसायिक अभ्यासक्रमातील द्वितीय वर्षातील प्रवेशीत विद्यार्थ्याचे MSBTचे (NOC FOR MIGRATION) सादर करणे आवश्यक आहे.

२४) प्रस्तुत विद्यापीठाशिवाय इत्तर विद्यापीठातुन द्वितीय वर्ष उत्तीर्ण विद्यार्थ्यांना तृतीय वर्षात प्रवेश देण्यात येऊ नयेत.

२५) **प्रवेश पात्रते संदर्भात कोणत्याही विद्यार्थ्यास विद्यापीठात पाठवु नये.**

२६) व्यावसायीक अभ्यासक्रमांसंदर्भात केंद्रीय पध्दतीने होणाऱ्या प्रवेशाबाबत प्रवेश नियंत्रण समिती व संबंधीत प्राधिकारणाची मान्यता सादर करावी.

२७) पात्रता यादी तयार करतांना विद्यार्थ्यांच्या मुळ गुणपत्रकावरचे जे नाव आहे तेच नाव पात्रता आवेदन पत्रात लिहावे, यादीमध्ये नावात चूक झाल्यास, त्यास महाविद्यालय जबाबदार राहील.

२८) विद्यार्थ्यांनी पात्रता आवेदन पत्रात नमुद केलेले विषय परीक्षा आवेदन पत्रावर नमुद करावे कोणत्याही परीस्थितीत बदलता येणार नाही.

२९) विद्यार्थ्याच्या आवेदन पत्रात भ्रमणध्वणी क्रमांक व ईमेल अचुक टाकावे.

३०) महाविद्यालयातील प्राचार्य /संचालक यांचे भ्रमणध्वणी क्रमांक किंवा ईमेल यात बदल झालेले असल्यास **onlinesrtmun@gmail.com** या ईमेलवर पाठवावे.

**संचालक**
**परीक्षा व मुल्यमापन मंडळ**

प्रत: १)मा.कुलसचिव,प्रस्तुत विद्यापीठ
२)मा.वित्त व लेखाधिकारी,प्रस्तुत विद्यापीठ.
३)मा.संचालक उपकेंद्र,लातूर.
४)मा.संचालक उपकेंद्र,परभणी.
५)सांखिक,सांखिकी विभाग,प्रस्तुत विद्यापीठ यांना सुचित करण्यांत येते की महाविद्यालयांची प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संकलीत करून संग्रही ठेवावी.
६)सिस्टीम एक्सपर्ट,यांना सुचित करण्यात येते की,प्रस्तुत विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर,विष्णुपुरी,नांदेड –४३१६०६(महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 (Maharashtra)

Established on 17th September 1994,Recognized by UGC U/s 2(f)and 12(B),NAAC Re accredited with 'A'Grade

**DEPARTMENT OF EXAMINATION (ELIGIBILITY SECTION)**

Phone:(02462)229242,43,44 Website:srtmun.ac.in


Ref.No. :Exam./Eligibility/2018-19/3257 Date :- / / 2019

## No Dues Certificate

This is to Certify that ……………………………………………………………………

College Name ……………………………………………………………………..................

College Code ……………………………………………………………………………

has applied for eligibility for the Academic Year 2018 -19.

Please provide no dues Certificate by which eligibility can be issued.

-sd-
Director
Board of Examination and Evaluaion

| Sr. No. | Name of the Department | Sign. & Stamp | Remark |
|---|---|---|---|
| 01 | Student Welfare Section | | |
| 02 | Sports Section | | |
| 03 | N.S.S. Section | | |
| 04 | Affilation Section | | |